माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये दाखल केलेली तक्रार**

**क्र.मुमाआ/नों.क्र.२२०६७५ / २२ /त.क्र.२६ /२६/०१**

श्री. मंगेश कृष्णा घाडी
साई सकाई सी/२०३, २ रा माळा, साई सकाई नगर,
मु.पो.उमेळे, नायगांव (प), ता.वसई, जि.पालघर, पिन-४०१२०७.

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सह प्रमुख कामगार अधिकारी प.उप
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख कामगार अधिकारी (कामगार) यांचे कार्यालय,
महापालिका मुख्यालय,४ था मजला, विस्तारीत इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई – ४००००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रमुख कामगार अधिकारी
बृहन्मुंबई महानगरपालिका प्रमुख कामगार अधिकारी (कामगार) यांचे कार्यालय,
महापालिका मुख्यालय,४ था मजला, विस्तारीत इमारत,
महापालिका मार्ग, मुंबई – ४००००१.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : २०.०१.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारदार | : | उपस्थित (प्रतिनिधी) |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | अनुपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

प्रस्तुत प्रकरणी अपील क्रमांक १६७२/२१ दिनांक २४/११/२०२१ रोजी यात पारित आदेशाचे अनुपालन झाले नसल्याचा आक्षेप तक्रारदार श्री. मंगेश घाडी यांनी नोंदविला असला तरी विद्यमान जन माहिती अधिकाऱ्यांनी व अपिलीय अधिकाऱ्यांनी या संदर्भात तक्रारदार यांनी मुद्दा क्रमांक एक व सहा याची माहिती दिली असून मुद्दा क्रमांक तीन, चार व पाच याची माहिती प्रश्नार्थक व वैयक्तिक स्वरूपाची असल्याचे नमूद केले. तसेच अपिलार्थींनी द्वितीय अपीलाच्या आदेशाच्या अनुषंगाने अभिलेख निरीक्षणाच्या दरम्यान अभिलेखाचे निरीक्षण न करता बेस्ट फाईव्ह नुसार गुण कमी करण्याबाबतच्या परिपत्रकाची मागणी केली जे परिपत्रक कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नाही.

आज झालेल्या सुनावणीत तक्रारदार श्री.घाडी यांनी मिळालेली माहिती ही त्रोटक असून द्वितीय अपील अर्जात दिलेल्या स्वयंस्पष्ट आदेशाचा अवमान केला असल्याचे दर्शविले आहे. ही बाब लक्षात घेता तसेच मागितलेल्या माहितीचा कालावधी व व्याप्ती लक्षात घेता दिनांक २४/ ११ / २०२१ रोजीच्या आदेशात नमूद

jyotsna

केल्याप्रमाणे अपिलार्थीनी कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली सन २०१६ साली झालेल्या अपंगांच्या भरतीबाबत उपलब्ध असलेल्या सर्वच दस्तऐवजांची विनामूल्य छायांकित प्रत देण्यात यावी या संदर्भात सार्वजनिक प्राधिकरणाने हाती घेतलेल्या निवड प्रक्रियेबाबत श्री.विकास घुगे विरुद्ध बृहन्मुंबई महानगरपालिका या निर्णयात या आधीच सविस्तर विवेचन केले असून विशेषतः दिव्यांग क्रीडा व मागास प्रवर्ग यासाठी आरक्षित असलेल्या जागा भरती करत असताना सादर केलेले दस्तऐवज हे खाजगी व वैयक्तिक स्वरूपाचे नसल्याबाबत या आधीच आयोगाने निर्णय दिला असून उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरणी वरील निर्णय प्रक्रियेबाबत अभिलेखात उपलब्ध असलेली सर्वच माहिती तक्रारदार यांना विनामूल्य प्रदान करण्यात यावी.

**आदेश**

**१.वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२.वरील तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission ★ Maharashtra ★

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २०.०१.२०२६**

jyotsna